# वेल्ह्याच्या विकासाच्या पवारांनी आत्तापर्यंत फक्त गप्पा मारल्या



**वेल्हे (दत्तात्रय नलावडे) :** अत्यंत मागास तालुका म्हणून वेल्हे तालुका ओळखला जातो. तालुक्यात मागासलेपणा घालविण्यासाठी येथील रहिवाशांना पर्यटन उद्योगाच्या माध्यमांतून, शेतीसिंचनातून रोजगार देण्याच्या घोषणा केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार २०-२५ वर्षांपासून करत आहेत. एकीकडे विकासांच्या घोषणा सुरू आहेत तर दुसरीकडे स्वराज्यभूमी असलेली जमीन विकून छत्रपती शिवरायांचे मावळे वंशज देशोधडीला लागले आहेत.

गेल्या १५-२० वर्षात वेल्ह्यातील पानशेत, वरसगाव धरण खोऱ्यांपासून वेल्हे, तोरणा, राजगड, थेट रायगड केळद, कर्नावट भिसर पर्यंतच्या निम्म्याहून अधिक जमिनी मावळ्या शेतकऱ्यांनी विकून टाकल्या आहेत. या जमिनीवर

रस्त्यांचा खरा फायदा भांडवलदारांना होणार आहे. अशीच स्थिती निवोजित मढे घाट रस्त्याची आहेत. दुष्काळात तेरावा महिना अशी उपरोधिक म्हण प्रचलित आहे. वेल्हे हा पूर्ण जिल्ह्यात तेरावा तालुका आहे. सरकारी अधिकारी, कर्मचारी या तेराव्या तालुक्यात नोकरी करण्यास नाखूष असतात. दुर्गम व डोंगराळ वेल्ह्याला विकासाबाबत राज्यकर्तेही कायम नाखूष आहेत. वेल्ह्याच्या विकासासाठी राज्यकर्त्यांनी भरीव प्रयत्न केले नाहीत याचे दर्शन दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की पाहवयास मिळत आहे.

पानशेत, वरसगाव, गुंजवणी व खडकवासला अशी चार धरणे तसेच भाटघरचे पाणलोट क्षेत्र असलेला वेल्हे तालुक्यातील निम्म्याहून अधिक

फसल्या असताना ठेकेदार पैसे घेऊन गायब होतात. राजगड खोऱ्यातील मेटपिलावरे, देवपाळ, रांजणे, आस्कवडी, आदी ठिकाणी नळयोजना फसल्या आहेत. सरकारी आकडेवारी नुसार १२९ गावांपैकी २७ गावे पाणी टंचाईग्रस्त आहेत.

पुण्या-मुंबईत हॉटेल्स, ढाबे, दुकानांत, कंपन्यात नोकरी, काम करणाऱ्या वेल्ह्यातील तरुणांना स्थानिक भागात रोजगाराचे कोणतेच साधन नाही. औद्योगिक वसाहत नाही. पानशेत सारख्या ठिकाणी इयत्ता दहावीनंतर शिक्षणाची सोय नाही. सिंगापूर, खाणु, गारजाईवाडी, मोहरी, कर्नावट, चांदर अशा ऐतिहासिक खेड्यात रस्ते, वीज, पाण्याची सोय नाही. वेल्ह्यातील बहुताशी शेती अद्यापही पावसावरच अवलंबून आहे.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.